आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

७ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता/ पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार
- राज्यात राज्यसभेच्या दोन जागांवरल्या पोटनिवडणुकीसाठी ३ सप्टेंबरला मतदान
- बांगलादेशाच्या हंगामी प्रधानमंत्रीपदी नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनुस यांची नियुक्ती
- नागपुरात अत्तराच्या गोदामाला लागलेल्या आगीत एकाचा मृत्यू, तीन जण जखमी

**आणि**

- वजन अधिक भरल्यानं भारताची पैलवान विनेश फोगाट पॅरीस ऑलिम्पिकमधून अपात्र/ क्रीडामंत्र्यांकडून स्पष्टीकरणाची विरोधकांची मागणी

**<><><><><>**

शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सिंचन करण्यासाठी. महत्वाकांक्षी वैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. यामुळे पावणे चार लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे.

**<><><><><>**

खासदार उदयनराजे भोसले आणि पीयूष गोयल राज्यातून लोकसभेवर निवडून गेल्यानं रिक्त झालेल्या राज्यसभेच्या दोन जागांच्या पोटनिवडणुकीसाठी येत्या 3 सप्टेंबरला मतदान होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं आज एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली.  राज्यासह देशभरातल्या राज्यसभच्या  १२ जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. त्यासाठी या महिन्याच्या १४ तारखेला अधिसूचना जारी

केली जाणार आहे. या महिन्याच्याच २२ तारखेला अर्जांची छाननी होईल. २६ तारखेपर्यंत अर्ज मागे घेतले जातील आणि ३ सप्टेंबरला मतदान होईल. ६ सप्टेंबरला निकाल जाहीर केले जातील.

<><><><><>

बांगलादेशाचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी तिथली संसद बरखास्त करुन हंगामी सरकारच्या प्रधानमंत्रीपदी नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनुस यांची नेमणूक केली आहे. लष्कराच्या तिनही दलांचे प्रमुख आणि विद्यार्थी संघटनांच्या शिष्टमंडळासोबत काल झालेल्या बैठकीनंतर त्यांनी हा निर्णय जाहीर केला. मोहम्मद युनुस यांनी ग्रामीण बँकेच्या माध्यमातून गरीबीविरोधी मोहीम राबवल्याबद्दल २००६ मध्ये त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

सरकारमधल्या अन्य मंत्र्यांची निवड विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत करुन केली जाईल, अशी माहिती राष्ट्रपतींच्या जनसंपर्क सचिवांनी माध्यमांना दिली. दरम्यान बांग्लादेशच्या माजी प्रधानमंत्री खालिदा झिया यांची स्थानबद्धतेतून सुटका करण्यात आली आहे.

लष्कराने सत्तेची सूत्रं हाती घेतल्यानंतर देशातल्या अनेक भागात हिंसाचाराच्या घटना घडल्या. आतापर्यंत झालेल्या हिंसाचारात ४४० जणांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, ढाका इथल्या भारतीय उच्चायुक्तालयातले अत्यावश्यक नसलेले कर्मचारी आणि कुटुंबं भारतात परतले आहेत.

<><><><><>

बांगलादेशातून होणाऱ्या संभाव्य बेकायदेशीर स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर मणिपूर राज्य सरकारनं फेरजॉल आणि जिरिबाम जिल्ह्यात रात्रीच्या वेळी संचारबंदी लागू केली आहे. दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश जारी

केले. बंदुक, तलवार, काठी, दगड किवा कुठलंही धारदार शस्त्र बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे.

<><><><><>

लोकसभेत आज २०२४साठीच्या अर्थ विधेयकावरच्या चर्चेला पुन्हा सुरुवात झाली. अर्थमंत्री निर्मला सीतारमण आज संध्याकाळी या चर्चेला उत्तर देण्याची शक्यता आहे. दरम्यान, या वर्षीच्या अर्थसंकल्पातली ध्येयं साध्य करण्यासाठी हे अर्थविधेयक मदत करेल, असा विश्वास या चर्चेदरम्यान भाजपच्या खासदार जगदंबिका पाल यांनी व्यक्त केला. काँग्रेसचे मुहम्मद हमदुल्ला सयीद यांनी अर्थ विधेयकाला विरोध केला. हे सरकार कॉर्पोरेट कंपन्यांना करात अधिक सवलत देत असून सामान्य नागरिकांवरचा कर वाढवत असल्याचा आरोप त्यांनी केला. ही चर्चा अद्याप सुरू आहे.

<><><><><>

वायनाडमध्ये दरड कोसळून झालेली दुर्घटना राष्ट्रीय आपत्ती म्हणून घोषित करावी, अशी मागणी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज केली. सभागृहात शून्य प्रहरादरम्यान त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आणि दुर्घटनाग्रस्तांना नुकसानभरपाई वाढवून देण्याचीही मागणी केली. अशा प्रकारच्या आपत्तीचा सामना करू शकेल अशा पायाभूत सुविधांसह वायनाडसाठी सर्वसमावेशक पुनर्वसन निधी जाहीर करावा, असं राहुल गांधी म्हणाले. वायनाडमध्ये केंद्र आणि राज्यांची सरकारं, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, राज्य आपत्ती प्रतिसाद दल, लष्कर, नौदल, तटरक्षक दल, अग्निशमन दल यांनी केलेल्या कामाचं त्यांनी कौतुक केलं.

<><><><><>

न्यूझीलंडचे गव्हर्नर जनरल डेम सिंडी किरो यांच्या निमंत्रणावरून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज तीन दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीदरम्यान राष्ट्रपती मुर्मू गव्हर्नर जनरल किरो यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करतील आणि प्रधानमंत्री क्रिस्टोफर लक्सन यांची भेट घेतील. राष्ट्रपती मुर्मू एका शैक्षणिक परिषदेला संबोधित करतील आणि भारतीय समुदाय आणि भारतातल्या मित्रांशी संवाद साधतील. राष्ट्रपती मुर्मू फिजीचा २ दिवसांचा दौरा पूर्ण केल्यानंतर न्यूझीलंडला पोहोचतील. फिजी भेटीदरम्यान, राष्ट्रपतींनी फिजिच्या संसदेला संबोधित केलं.

<><><><><>

भारतीय स्टेट बँकेच्या अध्यक्षपदी सी. एस. शेट्टी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ३ वर्षांसाठी असेल. बँकेच्या सर्वात वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक पदावर कार्यरत असलेले शेट्टी २८ ऑगस्टला दिनेश कुमार खारा यांच्याकडून अध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारतील. कॅबिनेटच्या नियुक्ती मंडळानं शेट्टी यांच्या अध्यक्षपदी नियुक्तीच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

<><><><><>

नागपूर शहरातल्या इतवारी या मुख्य बाजारपेठेत अत्तराच्या गोदामाला लागलेल्या आगीत एका तरुणीचा होरपळून मृत्यू झाला तर तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. आगीची माहिती मिळाल्यानंतर अग्निशमन दलानं आग आटोक्यात आणली.

दुर्घटनेतल्या जखमींमध्ये एका जोडप्याचा समावेश असून त्यांची प्रकृती गंभीर आहे. गोदामात अत्तर आणि चप्पल तसंच प्लास्टिक असल्यानं आग फैलावली आणि बचावात अडचणी आल्याची माहिती अग्निशमन दलानं दिली आहे.

<><><><><>

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे दिल्लीत काँग्रेस नेत्यांना भेटायला जातात, मात्र महाराष्ट्रातले प्रश्न मांडत नाहीत, अशी टीका भाजपा आमदार आशीष शेलार यांनी केली आहे. राज्यातले नेते दिल्लीला गेले तर ठाकरे टीका करतात, पण स्वतः काँग्रेसच्या नेत्यांना भेटायला जातात असंही शेलार म्हणाले.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला मोठा धक्का बसला आहे. भारताची पैलवान विनेश फोगाट हिला ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आलं आहे. अंतिम फेरीच्या आधी तिचं वजन काही ग्रॅमनं अधिक भरल्यानं तिच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळं विनेशला अंतिम फेरीचा सामना खेळता येणार नाही आणि तिला पदकही दिलं जाणार नाही. कालच विनेश फोगाट ऑलिम्पिकमध्ये अंतिम फेरीत धडक मारणारी पहिली भारतीय महिला पैलवान ठरली होती. तिनं ५० किलो वजनी गटात क्युबाच्या युस्नेलिस गुझमान लोपेझ हिच्यावर ५-० अशी मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तिचा अंतिम सामना आज रात्री अमेरिकेच्या सारा ॲन हिल्डरब्रान्ड्ट हिच्याशी होणार होता. दरम्यान, पैलवान विनेश फोगाटला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अपात्र ठरवल्याच्या मुद्द्यावरून विरोधकांनी आज लोकसभेत सरकारवर टीकास्त्र सोडलं. क्रीडामंत्र्यांनी याबाबत उत्तर द्यावं, अशी मागणी त्यांनी लावून धरली. यावर क्रीडामंत्री दुपारी तीन वाजता लोकसभेत उत्तर देणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणी समाजमाध्यमावर पोस्ट करून धक्का आणि दुःख व्यक्त केलं. त्यांनी भारतीय ऑलिम्पिक समितीच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांच्याशी संपर्क साधला. अशा परिस्थितीत भारतासमोर काय पर्याय उपलब्ध आहेत, याबाबत त्यांच्याशी त्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

मात्र, ३००० मीटर स्टीपलचेज स्पर्धेच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या अविनाश साबळेकडून पदकाची अपेक्षा कायम आहे. पुरुष हॉकीच्या उपांत्य फेरीत भारताच्या संघाला जर्मनीनं ३-२ असं पराभूत केल्यामुळे सुवर्ण किंवा रौप्यपदकाचं त्यांचं स्वप्न भंगलं. आता रौप्यपदकासाठी त्यांचा सामना उद्या स्पेनशी होणार आहे.

याशिवाय, टेबल टेनिसमध्ये भारतासाठी आजचा दिवस महत्त्वाचा आहे. सांघिक स्पर्धेत मनिका बत्रा, श्रीजा अकुला आणि अर्चना कामत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी जर्मनीविरुद्ध लढत देतील. २०२० च्या टोक्यो ऑलिम्पिकमध्ये कास्यपदक जिंकणारी भारोत्तोलक मीराबाई चानू सलग दुसऱ्यांदा पदक जिंकण्याचं ध्येय ठेवून मैदानात उतरेल.

दरम्यान, मॅरेथॉन रेस वॉक रिले मिश्र प्रकारात सूरज पन्वर आणि प्रियांका चौधरी, तर अडथळ्यांच्या शर्यतीत ज्योती याराजी स्पर्धेतून बाहेर पडले.

याशिवाय महिलांच्या एकेरी स्ट्रोक प्ले स्पर्धेत अदिती अशोक आणि दीक्षा मैदानात उतरतील., उंच उडीत सर्वेश कुशारे, तर तिहेरी उडीत अब्दुल्ला नारंगोलिंतेविडा आणि प्रवीण चित्रवेल पहिल्या फेरीत खेळतील.

दरम्यान, या स्पर्धेत दोन पदकांची कमाई करणारी नेमबाज मनू भाकर आज भारतात परतली. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर युवा कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाचे अधिकारी आणि चाहत्यांनी तिचं उत्साहाने स्वागत केलं.